# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८
## अ प्रभाग समिती
## सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक 04]

दिनांक : 11/01/2022 वेळ : सकाळी 11.30 वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे जानेवारी 2022 ची मासिक सभा मंगळवार दिनांक **11/01/2022** रोजी सकाळी 11.30 वा. अ क्षेत्रीय कार्यालयातील "राजमाता जिजाऊ सभागृह" येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. मा.शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे | सभापती |
| 2. मा. अनुराधा गणपत गोरखे | सदस्या |
| 3. मा.यादव मिनल विशाल | सदस्या |
| 4. मा.वैशाली जालिंदर काळभोर | सदस्या |
| 5. मा.शर्मिला राजू बाबर | सदस्या |
| 6. मा.अमित राजेंद्र गावडे | सदस्य |
| 7. मा. कांबळे राजेंद्र नामदेव | स्वीकृत सदस्य |

याशिवाय मा.श्रीमती शितल वाकडे-प्र.क्षेत्रिय अधिकारी, मा.श्री. रविंद्र पवार-कार्यकारी अभियंता(स्थापत्य), मा.श्री प्रवीण घोडे- कार्यकारी अभियंता (विद्युत), मा.श्री शिवाजी लोखंडे-लेखाधिकारी, मा.श्री के.डी.दरवडे-सहाय्यक आरोग्याधिकारी, मा.श्रीमती मोमीन झेड.आय.-उपअभियंता (झोनिपु-स्थापत्य),श्री सगर पी.व्ही.-उपअभियंता (झोनिपु-स्थापत्य),मा.श्रीमती माने के.व्ही.-उपअभियंता(पाणी पुरवठा), श्री पवार व्ही.एस.-कनिष्ठ अभियंता(विद्युत),श्री. स्वप्रील पाटील- कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), श्री अशोक मगर- कनिष्ठ अभियंता (स्थापत्य),श्रीमती पल्लवी सासे- कनिष्ठ अभियंत(स्थापत्य), श्री वाकोडे ए.एफ.-कनिष्ठ अभियंता (जलनि:स्सारण),श्रीमती सोनवणे पी.के. मा. श्री शेख एस.के.-कनिष्ठ अभियंता(झोनिपु), श्री अंकुश झिटे-मुख्य् आरोग्य् निरिक्षक,श्री मनोज शिंदे-मुख्य् लिपिक, श्री जयंत मरळीकर-अतिक्रमण पथक प्रमुख श्री रंगराव कारंडे-क्रिडा पर्यवेक्ष्क, श्री सुनिल दत्तू नाळे-उद्यान अधिकारी, श्री संतोष कदम- सर्व्हेअर-नगररचना श्री.एस.पी.राक्षे-असि. हॉर्टिकल्चर सुपरवायझर श्री कदम अरविंद-उद्यान सहाय्यक श्री पगार एस.जी.-जनरेटर ऑपरेटर इ. अधिकारी/ कर्मचारी बैठकीस उपस्थित होते.

मा.सभापती यांनी सर्व उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, अधिकारी यांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

कार्यपत्रिका क्रमांक ३ दिनांक १४/१२/२०२१ रोजी झालेल्या अ प्रभाग समिती सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत असलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

त्यानंतर प्रस्तुत सभेमध्ये खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

**विषय क्रमांक १**:- सन्मा.सदस्या अनुराधा गणपत गोरखे यांचा दिनांक ११/०१/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १० मधील दत्तनगर येथील जुने मोडकळीस आलेले स्वच्छतागृह पाडणेचे प्रस्तावास मान्यता देणे.

प्रभाग क्रमांक १० मधील दत्तनगर येथील जुनी मोडकळीस आलेली मनपा इमारत पाडून त्या ठिकाणी नवीन विरंगुळा केंद्र बांधणेचे प्रस्तावास मान्यता देणे.

प्रभाग क्रमांक १० मधील दत्तनगर,विद्यानगर,शंकरनगर येथील जुन्या कमानीचे नुतनीकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणे.

**विषय क्रमांक २**:- सन्मा.सदस्या शर्मिला राजू बाबर यांचा दिनांक ११/०१/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

निगडी प्राधिकरण से.२३ येथे मनपाची चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांना निवासासाठी कर्मचारी निवासस्थानाची व्यवस्था अस्तित्वात आहे. सद्यस्थितीत सदर इमारत धोकादायक स्थितीत असून सदर इमारतीमध्ये राहणा-या नागरिकांचे स्थलांतर करणेत आलेले आहे.तरी सदर धोकादायक स्थितीमध्ये असलेली इमारत तात्काळ निष्काषित करणेचे प्रस्तावास मान्यता देणे.

**विषय क्रमांक ३**:- सन्मा.सदस्या शर्मिला राजू बाबर यांचा दिनांक ११/०१/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

श्री चिंतामण दगडू पांढारकर यांच्या जागेमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना नागरिकांच्या सोईसाठी १९८० साली तात्पुरत्या स्वरुपामध्ये स्वच्छतागृह बांधकाम करण्यासाठी तात्पुरती परवानगी दिली होती. आता ह्या परिसरामध्ये अनेक नागरिकांनी आपले स्वतंत्र स्वच्छतागृहे बांधली आहेत. तसेच सदर स्वच्छतागृहाचा काही भाग रस्ता रुंदीकरणात देखील जात आहे. तसेच ते मोडकळीस देखील आले आहे. बाजूलाच नाल्यावरती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी नवीन स्वच्छतागृह बांधलेले आहे. त्यामुळे या स्वच्छतागृहाचा वापर कमी झाला असून ते मोडकळीस आल्याने नागरिक त्या ठिकाणी मोठया प्रमाणावर कचरा टाकतात, त्या ठिकाणी दुर्गंधी पसरते. आम्हाला व नागरिकांना नाहक त्रास होतो.तरी त्यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याकडून इतक्या वर्षामध्ये कसलेही भाडे किंवा अन्य् मोबदला घेतलेला नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला त्यांनी सहकार्य केले आहे, त्याचा विचार करुन सदर मोडकळीस आलेले दुर्गंधी व कच-याचे साम्राज्य् असलेले स्वच्छतागृह पाडून त्यांची जागा मोकळी करुन देऊन जागेचा ताबा देणेचे प्रस्तावास मान्यता देणे.

**विषय क्रमांक** ४:- सन्मा.सदस्या वैशाली जालिंदर काळभोर यांचा दिनांक ११/०१/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक१४ मधील मोहननगर मधील महात्मा फुलेनगरमध्ये धोबीघाट आहे. तेथील पाण्याच्या टाकीचा वापर होत नसल्यामुळे तसेच पाणी वर चढत नसल्यामुळे ती टाकी पाडण्याचे प्रस्तावास मान्यता देणे.

**सभेत खालीलप्रमाणे ठराव मंजूर करणेत आले.**

ठराव क्रमांक 15 विषय क्रमांक 1

दिनांक 11/01/2022 विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: अनुराधा गणपत गोरखे अनुमोदक : शर्मिला बाबर

संदर्भ:- १) सन्मा.सदस्या अनुराधा गणपत गोरखे यांचा दिनांक 11/01/2022 रोजीचा प्रस्ताव.

१) प्रभाग क्रमांक १० मधील दत्तनगर येथील जुने मोडकळीस आलेले स्वच्छतागृह पाडणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

२)प्रभाग क्रमांक १० मधील दत्तनगर येथील जुनी मोडकळीस आलेली मनपा इमारत पाडून त्या ठिकाणी नवीन विरंगुळा केंद्र बांधणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

३)प्रभाग क्रमांक १० मधील दत्तनगर,विद्यानगर,शंकरनगर येथील जुन्या कमानीचे नुतनीकरण करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------------------------------

ठराव क्रमांक 16 विषय क्रमांक 2

दिनांक: 11/01/2022 विभाग: सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा. शर्मिला राजू बाबर अनुमोदक:मा.अनुराधा गणपत गोरखे

संदर्भ:-१) सन्मा.सदस्या शर्मिला राजू बाबर यांचा दिनांक ११/०१/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

निगडी प्राधिकरण से.२३ येथे मनपाचीचतुर्थ श्रेणी कर्मचा-यांना निवासासाठी कर्मचारी निवासस्थानाची व्यवस्था अस्तित्वात आहे. सद्यस्थितीत सदर इमारत धोकादायक स्थितीत असून सदर इमारतीमध्ये राहणा-या नागरिकांचे स्थलांतर करणेत आलेले आहे.तरी सदर धोकादायक स्थितीमध्ये असलेली इमारत तात्काळ निष्काषित करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

---

ठराव क्रमांक 17 विषय क्रमांक 3

दिनांक 11/01/2022 विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव

सुचक: मा.शर्मिला राजू बाबर अनुमोदक:मा.अनुराधा गणपत गोरखे

संदर्भ:-१) सन्मा.सदस्या शर्मिला राजू बाबर यांचा दि.११/०१/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

श्री चिंतामण दगडू पांढारकर यांच्या जागेमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना नागरिकांच्या सोईसाठी १९८० साली तात्पुरत्या स्वरुपामध्ये स्वच्छतागृह बांधकाम करण्यासाठी तात्पुरती परवानगी दिली होती. आता ह्या परिसरामध्ये अनेक नागरिकांनी आपले स्वतंत्र स्वच्छतागृहे बांधली आहेत. तसेच सदर स्वच्छतागृहाचा काही भाग रस्ता रुंदीकरणात देखील जात आहे. तसेच ते मोडकळीस देखील आले आहे. बाजूलाच नाल्यावरती पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी नवीन स्वच्छतागृह बांधलेले आहे. त्यामुळे या स्वच्छतागृहाचा वापर कमी झाला असून ते मोडकळीस आल्याने नागरिक त्या ठिकाणी मोठया प्रमाणावर कचरा टाकतात, त्या ठिकाणी दुर्गंधी पसरते. आम्हाला व नागरिकांना नाहक त्रास होतो.तरी त्यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याकडून इतक्या वर्षामध्ये कसलेही भाडे किंवा अन्य् मोबदला घेतलेला नाही. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला त्यांनी सहकार्य केले आहे, त्याचा विचार करुन सदर मोडकळीस आलेले दुर्गंधी व कच-याचे साम्राज्य् असलेले स्वच्छतागृह पाडून त्यांची जागा मोकळी करुन देऊन जागेचा ताबा देणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 18
दिनांक :11/01/2022
सुचक: मा.वैशाली जालिंदर काळभोर

विषय क्रमांक 4
विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक :मा. अनुराधा गणपत गोरखे

संदर्भ:- १)सन्मा. सदस्या वैशाली जालिंदर काळभोर यांचा दि.११/०१/२०२२ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक१४ मधील मोहननगर मधील महात्मा फुलेनगरमध्ये धोबीघाट आहे. तेथील पाण्याच्या टाकीचा वापर होत नसल्यामुळे तसेच पाणी वर चढत नसल्यामुळे ती टाकी पाडण्याचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे- सभापती,अ प्रभाग समिती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी/अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक:-अक्षेका/9/कावि/ 5/1/2022 दिनांक:- 24/01/2022.

(शितल वाकडे)
प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती, निगडी-44

प्रति, सर्व संबंधित ---------------------------